महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४३५६/४१०/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक /वास्तूकला/२०२६/ दिनांक : २३/०९/२०२६

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता कॅप फे-या पुर्ण झाल्यानंतर रिक्त जागांवर संस्थास्तरीय प्रवेशासाठीचे वेळापत्रक प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका वास्तुकला अभ्यासक्रम**

संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालयाचे वेळापत्रक क्र.

१.तंशिसं/पदिवका प्रवेश वेळापत्रक/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदिवका/२०२६/कॅप फेरी/३२६, दि. ०२.०७.२०२६
२. तंशिसं/पदिवका प्रवेश वेळापत्रक/प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक/२०२६/४३६, दि. २५.०८.२०२६.
३. वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. CA/५/Academic/२०२६/Circular दि. ११.०९.२०२६

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता पुर्णवेळ पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संदर्भ १ व २ नुसार प्रवेशाचे वेळापत्रक घोषित केले आहे. त्यानुसार प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. दरम्यान संदर्भ क्र. ३ अन्वयें वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र प्राप्त झाले असून, त्यांनी वास्तुकला संस्थांमधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत वाढविला आहे. सबब वास्तुकला परिषदेच्या मान्यतेने सुरु असलेले दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रम प्रवेशासाठी सदरचा अंतिम दिनांक सुधारित करण्यात येत असून तो दि. ३०.०९.२०२६ असा करण्यात येत आहे. यासाठीच्या संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रिया संस्थेद्वारे घोषित वेळापत्रकानुसार पार पाडण्यात येतील. याकरीता विद्यार्थ्यांना नोंदणीची सुविधाही समांतररित्या उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तसेच संदर्भीय २ नुसार घोषित प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका वास्तुकला अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीचा अंतिम दिनांक ३०.०९.२०२६ व संस्थांसाठी डेटा अपलोड करण्याचा (प्रवेशीत झालेल्या उमेदवारांचा तपशील) शेवटचा दिनांक ३०.०९.२०२६ असा सुधारित करण्यात येत आहे, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

Digitally signed by
PRAMOD AMBADAS NAIK
Date: 23-09-2026
18:38:57

(डॉ. प्रमोद नाईक)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.